**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातल्या ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटी रुपये मदत करण्याचे शासन आदेश जारी/ पूरग्रस्त भागाची पाहणी करण्याचे मंत्र्यांना निर्देश

- राज्यात अतिवृष्टीमुळे ७० लाख एकरांवरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा कृषीमंत्र्यांचा अंदाज

- राज्यातल्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

**आणि**

- ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात अभिनेता मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान / ४ मराठी बालकलाकारांसह आशिष बेंडे, सुजय डहाके, 'शामची आई' चित्रपटही पुरस्कारानं सन्मानित

**<><><><>**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातल्या शेतकऱ्यांना मदत करण्याचे शासन आदेश दिले असून आतापर्यंत १ हजार ८२९ कोटींची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उर्वरित रक्कम येत्या दहा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

***होल्ड बाईट मुख्यमंत्री***

मदत जाहीर करण्याची प्रक्रिया निरंतरपणे चालू राहणार असून यापुढेही मदत निधीचे जीआर वितरीत केले जातील, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

आतापर्यंत ९७५ मिलिमीटर पाऊस झाला असून सरासरी पेक्षा १०२ टक्के जास्त पाऊस झाला आहे. पुरामुळे आठ जणांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी झाले आहेत. पूरग्रस्त भागात एनडीआरएफ, एसडीआरएफच्या सतरा तुकड्या तैनात केल्या आहेत. या

भागांचा आढावा घ्यायला मंत्र्यांना आणि पालकमंत्र्यांना सांगितलं आहे, आपण स्वतः काही भागांना भेट देणार आहोत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**व्हीसी**

*(**अतिवृष्टीमुळे** ७० लाख एकरावरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा अंदाज कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत व्यक्त केला. जिथे अद्याप पंचनामे झालेले नाहीत किंवा आणखी नुकसानी झालेली असण्याची शक्यता आहे तिथे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत पोहोचवली जाईल असं आश्वासन भरणे यांनी दिलं. तर स्थानिक अधिकाऱ्यांशी चर्चा करून पंचनाम्यांचं काम युद्धपातळीवर पूर्ण केलं जाईल आणि शेतकऱ्यांना तत्काळ मदत केली जाईल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणाले. राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी पाहणी दौऱ्यादरम्यान पारगाव इथं मांजरा नदीच्या पूरस्थितीची पाहणी केली.*

***राज्यात** गेल्या काही दिवसात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती उद्भवली असून अनेक ठिकाणी पिकांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.*

*अहिल्यानगर, सोलापूर, बीड, परभणी या भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. **नाशिक** जिल्ह्यात गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यानं, विसर्गात वाढ करण्यात आली आहे. धरणातून सध्या दोन हजार २७२ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. **पैठण**चं जायकवाडी धरण पूर्ण भरलं असून, धरणात सध्या ९२ हजार ३९ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे धरणातून सध्या एक लाख तीन हजार ७५२ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. मांजरा धरणातून ४३ हजार ५१६, माजलगाव धरणातून एक लाख १५ हजार २४३, तर सिना कोळेगाव प्रकल्पातून ७० हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग होत आहे.)*

**<><><><>**

राज्यातल्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगानं आज जाहीर केला. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक धरण्यात आला असून या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती निर्वाहक गणनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी जाहीर केली जाणार आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा कालपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. कृषी क्षेत्रातील नव्या कररचनेविषयी जाणून घेऊयात आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हीसी**

*(जीएसटी सुधारणेमुळे कृषी क्षेत्रात अनेक अनुकूल बदल होणार आहेत. नव्या कररचनेमुळे खतं, कीटकनाशकं यांच्या किमती कमी होतील. ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे विविध भाग, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, कापणी यंत्र या सर्वांवरचा जीएसटी आता ५ टक्के झाला आहे. यामुळे यांत्रिकीकरणाला चालना मिळेल तसंच अंगमेहनतही वाचेल. ठिबक-तुषार सिंचन कमी किमतीत उपलब्ध झाल्यामुळे अधिक जमीन ओलिताखाली येईल, याचा परिणाम उत्पादन वाढीवर होणार आहे. फळं, भाज्या, लोणी, तूप यांच्यावरचा जीएसटी ५ टक्के झाला असून दूध आणि पनीरवरचा जीएसटी शून्य करण्यात आला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढायला मदत मिळणार आहे. सौर ऊर्जेवर आधारित उपकरणांचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के झाला आहे. त्यामुळे सौर पम्पाचा वापर जास्तीत जास्त होईल आणि शेतकऱ्यांचा सिंचनाचा खर्च वाचेल.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या अकरा वर्षांत नवोपक्रमाला प्राधान्य दिल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं आज विकसित

भारत बिल्डाथॉन २०२५चं त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारनं आता अटल नवोन्मेष अभियान सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

तरुणांमध्ये सर्जनशीलता, समस्या निवारण आणि स्वावलंबन विकसित करणं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. शिक्षण मंत्रालयाचा शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, नीती आयोगाच्या अटल नवोन्मेष अभियानाच्या सहकार्याने यंदा १३ ऑक्टोबर रोजी या उपक्रमाचं आयोजन करत आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थी आजपासून ६ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करू शकतात.

<><><><>

मुंबईत घाटकोपर इथं गेल्या वर्षी बेकायदा फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेसंदर्भातल्या उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल आज  मंत्रिमंडळानं आज झालेल्या बैठकीत शिफारशींसह स्वीकारला. न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालच्या या समितीनं सुचवलेल्या उपाययोजनांवरच्या कार्यवाहीचा कृती अहवालही मंत्रिमंडळानं स्वीकारला आणि संबंधित विभागांना एका महिन्यात कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला होता, तर ७०पेक्षा जास्त जण जखमी झाले होते.

शासकीय रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी, तसंच राज्य आरोग्य हमी सोसायटीला राखीव निधी द्यायला मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत मंजुरी मिळाली. विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेतून रुग्णाच्या उपचाराच्या दाव्यातून मिळणाऱ्या निधीचा विनियोग करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. गरजू रुग्णांसाठी ५ लाखांपेक्षा जास्त खर्च असणाऱ्या ९ प्रकारच्या दुर्मिळ आजारांवरचा खर्चही या राखीव निधीतून केला जाणार आहे.

नागपूर-नागभीड रेल्वे ब्रॉडगेजच्या कामासाठी ४९१ कोटी ५ लाख रुपये खर्चाला मंत्रिमंडळानं हिरवा कंदील दाखवला.

मुंबईतल्या अंधेरी इथं सरदार वल्लभभाई पटेल नगर इथं म्हाडाच्या माध्यमातून १२२ संस्थांच्या, तसंच ३०७ वैयक्तिक भूखंडावरच्या ४ हजार ९७३ सदनिकांच्या पुनर्वसनाला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><>**

७१वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. चित्रपट क्षेत्रातल्या अमूल्य योगदानासाठी मल्याळी अभिनेता 'मोहनलाल' यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आलं. सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'ट्वेल्थ फेल' या चित्रपटाला मिळाला. सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार 'रॉकी और रानी की प्रेमकहानी' या सिनेमाला मिळाला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार 'जवान' साठी शाहरूख खान आणि 'ट्वेल्थ फेल' साठी विक्रांत मस्सी यांना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार 'मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे' या सिनेमातल्या भूमिकेसाठी राणी मुखर्जी यांना मिळाला. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणासाठी 'आत्मपँफ्लेट' या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक आशिष बेंडे यांना सुवर्ण कमळ मिळालं. तर मराठीतला सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला 'शामची आई'. 'श्यामची आई' साठीचा पुरस्कार अमृता राव यांनी स्वीकारला, दिग्दर्शक सुजय सुनील डहाके यांना दिग्दर्शकाचं रजत कमळ मिळालं. राष्ट्रीय चित्रपट महामंडळाच्या 'लेंटीना आओ' या चरित्रात्मक माहितीपटाला, तसंच भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला 'फ्लॉवरिंग मॅन' या माहितीपटासाठी पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट बालकलाकारांमधेही ४ मराठी बालकलाकारांचा समावेश होता. 'नाळ - दोन' ला सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा पुरस्कार मिळाला. मेघना गुलजार यांना 'सॅम बहादूर' चित्रपटासाठी विशेष मूल्य विभागात पुरस्कार मिळाला.

**<><><><>**

देशातल्या तरुणांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली आहेत. सरकारनं उद्योजकता आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या याविषयी आजच्या सेवा पर्व या विशेष मालिकेत जाणून घेऊ या........

**व्हीसी**

*(केंद्र सरकारने ऑक्टोबर २०२२ मधे देशभरात रोजगार मेळावे आयोजित केले. तरुणांना रोजगार देऊन सक्षम करणं हा याचा हेतू होता. मागच्या तीन वर्षात देशभरात १६ रोजगार मेळावे आयोजित केले असून याद्वारे १० लाखापेक्षा जास्त तरुणांना नियुक्ती पत्रं मिळाली आहेत. साडेतीन कोटी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री*

*विकसित भारत रोजगार योजनेची घोषणा प्रधानमंत्र्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात केली होती......*

***होल्ड बाईट मोदी***

*स्टार्ट अप इंडिया उपक्रमाने देशात उद्योजकीय परिसंस्था उभारण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. या उपक्रमा अंतर्गत २०१६ पासून दीड लाख स्टार्ट अप उभे राहिले असून याद्वारे सतरा लाखांपेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. तर प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे लघु उद्योजकांना सहजरीत्या कर्ज उपलब्ध झालं आहे.)*

**<><><><>**

केंद्रीय पर्यावरण, वनं आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते आज पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यात नेटिव्ह फूड मॅटर्स या उपक्रमाचा प्रारंभ झाला. गोवर्धन इको व्हिलेजनं या उपक्रमाचं आयोजन केलं आहे. या उपक्रमाद्वारे तज्ञ आणि अभ्यासक एकत्र येतील आणि सहज उपलब्ध होणारं, परवडणारं, सांस्कृतिकदृष्ट्या साजेसं आणि आरोग्याला चांगलं अन्न आपल्याला मिळेल, असं मत सिंह यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<><><><>**

भंडारा जिल्ह्यात पालकमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत सेवा पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी भोयर यांच्या हस्ते प्रकल्पग्रस्त नागरिकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आलं.

**<><><><>**

तळेगाव - चाकण - शिक्रापूर राष्ट्रीय महामार्गाची दुरुस्ती आणि रुंदीकरणासाठी ५९ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली आहे. यामुळे या रस्त्यावरची वाहतूक कोंडी कमी होईल, अपघातांचा धोका कमी होईल आणि औद्योगिक वाहतुकीला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

२८ तारखेला नागपूर इथं निघणाऱ्या ओबीसी समाजाच्या मोर्चाच्या समर्थनार्थ सिंधुदुर्ग जिल्हा ओबीसी आणि आरक्षित समाज महासंघानं आज कुडाळ इथं लाक्षणिक उपोषण आणि इशारा आंदोलनाला सुरुवात केली. हे आंदोलन दोन दिवस चालणार आहे.

हैदराबाद गॅझेटचा निर्णय रद्द करण्याची आंदोलनकर्त्यांची मागणी आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये, अशी भूमिका महासंघाचे अध्यक्ष नितीन वाळके यांनी मांडली. तसंच देशपातळीवर जातनिहाय जनगणना व्हावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

<><><><>

रायगड जिल्ह्यात पाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या एका फार्म हाऊसवर मेंढ्यांची झुंज लावून जुगार खेळल्या प्रकरणी आज पोलिसांनी केलेल्या कारवाईत ७५ जणांना अटक केली असून १ कोटी ३७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसंच झुंजीसाठी वापरलेल्या मेंढ्यांची पोलिसांनी सुटका केली.

<><><><>

मराठवाड्यात नैऋत्य मौसमी पाऊस तीव्र होत आहे. गेल्या २४ तासात मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

हा संपूर्ण आठवडा राज्यातल्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडत राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात अनेक ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><>//